



# अवैध नळासाठी अभय योजना

**औरंगाबाद : अनधिकृत** नळकनेक्शन अधिकृत करून घेण्यासाठी मनपा प्रशासनातर्फे अभय योजना सुरू करण्यात आली आहे. अभय योजनेत नळ अधिकृत करून घेतले नाहीत तर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. ही योजना ३१ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी केले आहे.

शहरात अनधिकृत नळ कनेक्शनची संख्या एक लाखांपेक्षा जास्त आहे. मनपाकडे १ लाख २४ हजार अधिकृत नळ कनेक्शनची नोंद आहे. यामुळे एकीकडे पाणीपट्टी भरणाऱ्या नळधारकांना पुरेसे पाणी मिळत नाही तर दुसरीकडे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. यावर पहिल्यांदाच फौजदारी कारवाईचा इशारा मनपाने दिला आहे. अनधिकृत नळ अधिकृत करण्यासाठी अभय योजना सुरू करण्यात आली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत ही योजना सुरू राहणार आहे.




## मी धावणार माझ्यासाठी



'लोकमत तर्फे आयोजित हाफ मॅराथॉन स्पर्धा हा अतिशय स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत असून, पॅराडाईज इंग्लिश स्कूलमधील सर्व शिक्षक व शिक्षिका यामध्ये सहभागी होत आहोत. आम्ही या मॅराथॉनमध्ये शिक्षण क्षेत्राच्या प्रगतीसाठी आमचा सहभाग नोंदवीत आहोत.

-विश्वास सुरडकर (अध्यक्ष- पॅराडाईज इंग्लिश स्कूल)



**पॅराडाईज इंग्लिश स्कूल...** (डावीकडून उभे) माधुरी जावळे, अंजली कळमकर, ज्योत्स्ना देशमुख, स्मिता जाजू, अंजुषा झंजारी, सीमा व्यवहारे, विश्वास सुरडकर, भारती सुरडकर, अर्चना सुरडकर, अर्चना बुरघटे, श्रद्धा बारी, रश्मी दाणी, सोनिया पाठक, मनीषा जाधव, वंदना मेथी, शीतल कमलाकर, पूनम मोरे, रंजना चौधरी, सुमित्रा देशपांडे. (डावीकडून बसलेले) तृप्ती भाले, सुनीता कळम, मेघा पाथ्रीकर, विजया मंदवडे, नम्रता राऊतमारे, सोनल परदेशी, कल्पना जावळे, गायत्री पाटील, शमा शेख, रुपाली जाधव.


Co-Sponsors
RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION
Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE LIFE BEGINS HERE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (I) pvt.ltd | Partner


नाव नोंदणी व सहभागासाठी www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅराथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२



**अग्रवाल युवा मंच...** (डावीकडून उभे) अनुप अग्रवाल, सागर अग्रवाल, आदेश अग्रवाल, सागर अग्रवाल, आशिष अग्रवाल, दीपक अग्रवाल, अल्केश अग्रवाल, नवनीत भारतिया (अध्यक्ष), गोपाल भारुका, प्रमोद अग्रवाल, गिरीश अग्रवाल, राकेश कुंपावत (डावीकडून बसलेले) प्रतीक भवर, मोहित धानुका, गोपाल अग्रवाल, प्रतीक गिंदोडिया, नरेश धानुका, गणेश अग्रवाल.

**विज्ञान वर्धिनीचा सुवर्णमहोत्सव :** शिक्षणमंत्री विनोद तावडे यांचे आवाहन

# विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान द्या

**औरंगाबाद : माजी** विद्यार्थ्यांनी जर निर्धार केला, तर ते शाळेची गुणवत्ता वाढवू शकतात. शाळेचा पट वाढवू शकतात. विद्यार्थ्यांना शिकण्यात रस नाही. शिक्षकांनी कृतिशील शिक्षणावर भर द्यावा. विद्यार्थ्यांना जे येते ते त्यांना देण्याचा प्रयत्न करावा. गतिमान विचार करणाऱ्या आजच्या नव्या पिढीला आपण घोकंपट्टी देणार असाल तर खरंच त्यांच्या शिक्षणाबाबतच्या अपेक्षा पूर्ण करणार आहोत का, याचा विचार करा. विद्यार्थ्यांना माहिती नको, ज्ञान देण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी आज येथे केले.



विज्ञान वर्धिनी हायस्कूलच्या सुवर्ण महोत्सवी समारंभाचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करताना शिक्षणमंत्री विनोद तावडे. सोबत संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार श्रीकांत जोशी, अशोक उजळंबकर, आ. संजय शिरसाट, आ. अतुल सावे, आ. इम्तियाज जलील आदी.

विज्ञान वर्धिनी हायस्कूलच्या सुवर्णमहोत्सवी वर्ष समारंभासाठी शिक्षणमंत्री तावडे आज शुक्रवारी औरंगाबादेत आले होते. ते दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास विमानतळावर उतरताच कुटुंबियांकडून त्यांच्या सासऱ्यांच्या निधनाची बातमी मोबाईलवरून समजली. त्यामुळे काही क्षण ते कार्यक्रमाला जावे की परत मुंबईला या विचारात पडले. शेवटी त्यांनी कार्यक्रमास हजेरी लावून लगेच मुंबईला परतण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा टीचर्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी आमदार श्रीकांत जोशी यांनी त्यांचे स्वागत केले. अशोक उजळंबकर यांनी प्रास्ताविक केल्यानंतर लगेच विनोद तावडे बोलण्यासाठी उभे राहिले.

### मोर्चाने शिक्षकी पेशा बदनाम

- औरंगाबादेत मंत्रिमंडळ बैठकीवर निघालेल्या शिक्षकांच्या मोर्चात तसेच नंतर व्हॉटस्‌ॲपवर फिरलेल्या संदेशाद्वारे मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याची सल विनोद तावडे यांना बोचत असल्याचे आज त्यांच्या भाषणातून जाणवले. ते म्हणाले, शिक्षकांचे प्रश्न असतात. इथे शिक्षकांचा मोर्चा निघाला. मोर्चावर लाठीमार झाला.
- मोर्चात शिवीगाळ झाली. माझी शंभर टक्के खात्री आहे की, मोर्चात शिवीगाळ करणारे ते शिक्षक नव्हते. आमदार व्हायची इच्छा असणारांनी मोर्चात गुंड घुसविले होते. त्या मोर्चाने शिक्षकी पेशाला बदनाम केले. व्हॉटस्‌ॲपवरील संदेशाद्वारे मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना आई- बहिणीवरून शिवीगाळ करणारे शिक्षक असूच शकत नाहीत.

ते म्हणाले की, विरोधी पक्षाची भूमिका बजावलेल्या माझ्यासारख्या माणसावर राज्याच्या शिक्षण खात्याची धुरा सोपवली. राज्यातील शिक्षण सुधारण्याचे आव्हान आपण स्वीकारले. शिक्षणामध्ये महाराष्ट्र हा देशात १३ व्या क्रमांकावर होता. गेल्या दोन वर्षांत आपण महाराष्ट्राला ३ ऱ्या क्रमांकावर आणले. कृतिशील शिक्षण, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या उपक्रमातून आपण मराठी शाळांचा कायापालट केला. गेल्या दोन वर्षांत इंग्रजी शाळेचे १४ हजार विद्यार्थी मराठी शाळेत, त्यातल्या त्यात जिल्हा परिषदेच्या शाळात आले. २२७९ शाळांना 'आयएसओ' मानांकन मिळाले. ४४ हजार ४५६ शिक्षक तंत्रस्नेही बनले. हा आहे महाराष्ट्र माझा. पूर्वी शिक्षकांना शाळेत मोबाईल बंदी होती. ती आपण उठविली. जि.प. शाळांत 'स्पोकन इंग्लिश' हा उपक्रम सुरू केला आणि बघता बघता मुले इंग्रजी बोलू लागली. लोकसहभागातून शिक्षकांनी शाळांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये वर्गणी जमा केली. डिजिटल शाळा केल्या. शिक्षकांनी बदलत्या काळाचा वेध घेत विद्यार्थ्यांना शिकवावे, असे आवाहन करून विज्ञान वर्धिनी शाळेच्या आजी-माजी विद्यार्थी तसेच शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

**हॉकी ॲस्ट्रोटर्फसाठी प्रयत्न करणार**

मराठवाड्यातून भारताला ऑलिम्पिक खेळाडू निर्माण करण्यासाठी औरंगाबादेत हॉकी ॲस्ट्रोटर्फ आणि ॲथलेटिक्स सिन्थेटिक ट्रॅक उभारण्यात यावे, अशी मागणी ॲथलेटिक्स संघटनेचे माजी आ. श्रीकांत जोशी, हॉकी संघटनेचे राज्य सचिव पंकज भारसाखळे यांच्यासह राष्ट्रीयस्तरावर चमकदार कामगिरी केलेल्या खेळाडूंनी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे केली. ही मागणी मुद्रित केलेले स्मृतिचिन्ह तावडे यांना प्रदान केले. तेव्हा तावडे यांनी या मागणीबद्दल सकारात्मक भूमिका घेऊन येत्या अर्थसंकल्पामध्ये यासंदर्भात आग्रह धरू, असे आश्वासन दिले.

# बालमृत्यू दर कमी करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य

**प्रमोद जोग :** राज्यस्तरीय बालरोगतज्ज्ञांच्या परिषदेचे उद्घाटन

**औरंगाबाद : महाराष्ट्रात** हजार बालकांमागे ४२ मुले दगावतात. यामध्ये जन्मल्यानंतर पहिल्या २४ तासांत दगावण्याचे प्रमाण अधिक आहे. बालमृत्यू दर कमी करणे हे प्रत्येक बालरोगतज्ज्ञांचे कर्तव्य आहे. त्यासाठी त्यांनी आपले ज्ञान अद्ययावत करीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन अखिल भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. प्रमोद जोग यांनी केले.




इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित 'महापेडिकॉन -२०१६' या बालरोगतज्ज्ञांच्या तीनदिवसीय परिषदेचे शुक्रवारी दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना मान्यवर.

इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित 'महापेडिकॉन- २०१६' या बालरोगतज्ज्ञांच्या तीनदिवसीय परिषदेचे शुक्रवारी उद्घाटन झाले. याप्रसंगी डॉ. जोग बोलत होते. परिषदेस डॉ. संतोष सोन्स (मंगलोर), आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र वैद्य, सचिव डॉ. गणेश कुलकर्णी, 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. दत्ता कदम, डॉ. जयंत तुपकरी, डॉ. राजेंद्र खडके, डॉ. केदार सावळेश्वरकर, इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स औरंगाबादचे अध्यक्ष डॉ. प्रशांत जाधव, डॉ. मंदार देशपांडे, डॉ. अभय जैन, डॉ. मंजूषा शेरकर, डॉ. रेणू बोराळकर, डॉ. तृप्ती बोरुळकर आदींची उपस्थिती होती.

### भुकेची जाणीव व्हावी

- मुलांना सतत काही तरी खाऊ घालणे म्हणजे लाड होत नाही. मुलांना स्वत:हून भुकेची जाणीव होणे महत्त्वाचे आहे. सकाळी नाश्त्याशिवाय मुलांना बाहेर पडू देऊ नये, कडधान्य, पालेभाज्या, फळे यासह तंतूमय पदार्थांचा आहारात समावेश हवा. मीठ व साखर हे शत्रू असल्याने ते मुलांपासून दूर ठेवावे, असे 'बालकांचा आहार' विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. उपेंद्र किंजवडेकर म्हणाले. यावेळी डॉ. उमेश वैद्य, डॉ. पौर्णिमा प्रभू, डॉ. विष्णू बिरादार यांनीही मार्गदर्शन केले.

डॉ. जोग म्हणाले, जन्मानंतर पहिले सहा महिने बालकास केवळ आईचे दूध दिले पाहिजे. आईचे दूध बालकांसाठी अमृतच ठरते. जन्मल्यानंतर ज्या बालकांना आईचे दूध मिळत नाही, अशांसाठी रुग्णालयात मातृदुधाची पेढी ही संकल्पना राबविली पाहिजे. बालकांमधील साधारण आजारांवर सहज उपचार होतात. परंतु अवघड अशा आजारांवर उपचार करण्यासाठी डॉक्टरांनी आपले ज्ञान अद्ययावत केले पाहिजे, असे ते म्हणाले. 'एमजीएम' येथे आयोजित पदव्युत्तर शिक्षण कार्यशाळेत (पीजी क्लिनिंग) डॉ. वाय. के. आमडेकर यांनी मार्गदर्शन केले. 'श्वसनमार्ग विकार व्यवस्थापन' कार्यशाळेत डॉ. एन. के. सुब्रमण्य, डॉ. प्रकाश वैद्य, डॉ. जयंत जोशी, डॉ. मोडक आदींनी मार्गदर्शन केले.

## ग्रहताऱ्यांचे गूढ विद्यार्थ्यांसमोर उलगडले

**औरंगाबाद : डॉ.** बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सुरू असलेल्या इन्स्पायर शिबिरामध्ये दुसऱ्या दिवशी देश-विदेशातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विज्ञान जाणिवा जागविण्याचा प्रयत्न केला.

पहिल्या सत्रात तैवान विद्यापीठातील शास्त्रज्ञ चिंग यांग यू यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात अमेरिकेतील नासामध्ये कार्य केलेले डॉ. नितीन ओक यांनी ग्रहताऱ्यांसह विश्वाची माहिती उलगडून दाखविली. या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

विद्यापीठात पाचदिवसीय इन्स्पायर शिबिराला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी विविध विभागांना भेटी दिल्यानंतर विद्यार्थ्यांना शुक्रवारी देश-विदेशातील शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. तत्पूर्वी विद्यार्थ्यांच्या दिवसाची सुरुवात योगाभ्यासाने झाली.

सकाळी साडेपाच वाजता योगासने, प्रार्थना झाल्यानंतर व्याख्याने होत आहेत. बौद्धिकांमध्ये तैवान विद्यापीठातील प्रा. चिंग यांग यू यांनी सौरऊर्जाचे महत्त्व विशद करताना सौरऊर्जा ही काळाची गरज आहे. या ऊर्जेचा परिणामकारक वापर कसा करावा, याबाबत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

# मनपा ऑक्सिजन हबच्या मुळावर!

**दिल्ली अब दूर नहीं :** प्रियदर्शिनी गार्डनमधील झाडांवर पुन्हा कुऱ्हाड चालणार

**औरंगाबाद :** विद्यापीठ, हिमायतबागेनंतर औरंगाबाद शहराचे ऑक्सिजन हब असलेल्या प्रियदर्शिनी गार्डनवर पालिकेची वक्रदृष्टी गेली असून, या बागेचा पिकनिक पॉइंट करण्याचा घाट घातला जात आहे. १५ दिवसांपूर्वी जवळपास २०० झाडे तोडल्यानंतर आता सुबाभळीच्या झाडांवरही कुऱ्हाड चालविली जाणार आहे. तीन दिवसांपूर्वी पालिकेत झालेल्या वृक्षसंवर्धन समितीच्या बैठकीत ठराविक सदस्यांच्या उपस्थितीत हा निर्णय झाला.

सिडको एन ५ टाऊन सेंटर परिसरातील प्रियदर्शिनी उद्यान नऊ महिन्यांपूर्वी पालिकेने स्वत:कडे हस्तांतरित केले आहे. जवळपास दीड एकरावर पसरलेल्या या बागेत गुलमोहर, चिंच, निलगिरी, कांचन, लिंब यासह विविध प्रजातींची २५ ते ३० वर्षे जुनी झाडे आहेत. त्यांची निगा राखण्याचे सोडून पालिका या ठिकाणी पिकनिक पॉइंट करण्याच्या विचारात आहे. या ग्रीन बेल्टमधील २०० झाडांवर १५ दिवसांपूर्वी कुऱ्हाड चालविण्यात आली. सर्व स्तरातून विरोध झाल्यानंतर ही वृक्षतोड थांबविण्यात आली. यासंदर्भात वृक्षसंवर्धन समितीची यापूर्वी दोन वेळा बैठक बोलावली होती; मात्र आयुक्तांना वेळ न मिळाल्याने ती पुढे ढकलण्यात आली. अचानक मंगळवारी बैठक बोलावून पुन्हा वृक्षतोड करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता दोन हजारांपेक्षा जास्त सुबाभळीच्या झाडांवर कुऱ्हाड चालविली जाणार आहे. बागेत सद्य:स्थितीत ट्रॅक आहे. खेळण्या आहेत. मग झाडे तोडण्याचा अट्टहास कशासाठी, असा प्रश्न वनप्रेमींमधून उपस्थित केला जात आहे. झाडे तोडल्यानंतर या ठिकाणी प्लास्टिक-फायबरचे हत्ती, घोडे आणले जाणार आहेत. सिद्धार्थ गार्डनमध्ये असे नकली प्राणी आहेतच. त्याकडे दुर्लक्ष करणारी पालिका तोच प्रयोग इथे का राबवत आहे, असा सवाल सृष्टी सेवाभावी संस्थेचे डॉ. किशोर पाठक यांनी उपस्थित केला.

### 'सृष्टी'ची आयुक्तांकडे धाव



शहरातील ऑक्सिजन हबवर कुऱ्हाड चालवू नये, अशी मागणी सृष्टी सेवाभावी संस्थेचे डॉ. किशोर पाठक, पंकज शक्करवार, रुपाली शक्करवार, मिलिंद गिरधारी यांच्यासह विक्रीकर सहायक आयुक्त चंद्रशेखर बोर्डे आदींनी शुक्रवारी आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांच्याकडे केली. आता झाडे तोडली जाणार नाहीत, असे आश्वासन बकोरिया यांनी या शिष्टमंडळाला दिले आहे. यासंदर्भात समितीची पुन्हा बैठक घेऊ, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

**शहरातील ऑक्सिजन हब**

विद्यापीठ, हिमायतबाग, प्रियदर्शिनी गार्डन, सलीम अली सरोवर, चिकलठाणा एमआयडीसीतील ग्रीन झोन हे शहरातील ऑक्सिजन हब आहेत. हिमायतबागेतील हस्तक्षेपामुळे संकट आले असतानाच आता प्रियदर्शिनी गार्डनवरही कुऱ्हाड चालविली जात आहे. औरंगाबादेत सध्या जवळपास अडीच लाख झाडे आहेत. पुण्यात ही संख्या ४८ लाखांच्या घरात आहे.

**म्हणे, एकास दहा झाडे लावू**

बागेच्या सुशोभिकरणासाठी झाडे तोडली तर एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावली जातील, अशी प्रतिक्रिया पालिकेचे गार्डन निरीक्षक विजय पाटील यांनी 'लोकमत'ला दिली.

## उपनिरीक्षक पठाडे आत्महत्या प्रकरणात दोघांना जामीन

**औरंगाबाद : जालना** येथील उपनिरीक्षक प्रभाकर पठाडे यांनी १७ सप्टेंबर २०१६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पाठीमागे स्वत:च्या सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमधून गोळी झाडून आत्महत्या केली होती. या प्रकरणात दोघांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर यांनी जामीन मंजूर केला.

ट्रान्सपोर्ट व्यावसायिक शेख वहीद यांच्या फिर्यादीवरून जोगासिंग याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झालेला होता. या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक पठाडे यांच्याकडे होता. या गुन्ह्याचा तपास पठाडे व्यवस्थित करत नाही व त्यांनी आरोपी जोगासिंगच्या सोबत संगनमत केल्याचा आरोप करीत शेख वहीदने पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली होती. त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारात या गुन्ह्याच्या अनुषंगाने अनेक कागदपत्रेही मागवले होते. त्यानंतर उपनिरीक्षक पठाडे यांनी ही आत्महत्या केली व चिठ्ठी लिहून ठेवली. त्यामुळे या प्रकरणात पठाडे यांचे मेहुणे नंदकिशोर गव्हाणे यांच्या तक्रारीवरून मूळ तक्रारदार शेख वहीद व शेख मुजीब यांच्या विरुद्ध पठाडे यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली होती. दोघांचाही जामीन अर्ज जालना जिल्हा न्यायालयाने फेटाळल्याने त्यांनी खंडपीठात धाव घेतली. यात दोघांचा जामीन मंजूर झाला आहे.








